# <u>गल्लीचा रस्ता खुप आरामदायी</u>

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पक्षाच्या सदस्यांबरोबर गृह मंत्र्यांच्या निवासस्थानाच्या बाहेर धरणे धरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी अशा तीन पोलिसांच्या सस्पेंशनची मागणी केली आहे की, ज्यांनी स्वतःचे कर्तव्य बजावले नाही. साहजिकच आहे आप ला सचिवालयापेक्षा धरण्यावर बसणे अधिक आरामदायी आहे. गेल्या तीन आठवड्यात असे दिसून आले की, सचिवालयात पक्ष आत्मविनाशक स्थितीत आहे.

संपूर्ण देशात आप पक्षाचे सदस्य परस्पर विरोधाभासी भाषा बोलत होते. त्या पक्षात शिस्तीचा अभाव दिसून येतो. आप पक्षाच्या अनेक सपोर्टसनी आदर्शवादाच्या बाजूने मतदान केले होते. एका आंदोलनाचे नेतृत्त्व करणे आणि एका पक्षाची रचना करुन सरकार चालवणे या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. दआप पक्षाच्या कायद्या मंत्र्यांनी दिल्लीत राहणा-या आफ्रिकन नागरिकांसाठी एक गंभीर समस्या उभी केली आहे. त्यांची विचारधारा जातीयवादी असल्यासारखी वाटते. हा पक्ष काही दिवसातच स्वताच्या अपरंपरागत शैलीचा भोगी बनणार आहे. सुरुवातीस असे वाटत होते की, दिल्लीतील सरकारच्या रचनेमुळे हा पक्ष त्यांना पाठिंबा देणा-या धारकांचा उत्साह द्वीगुणीत करील. मात्र दिवसागणिक पक्षाचे काम लाजीरवाणे वाटत आहे. आप आणि कॉंग्रेस यांच्यात किती पारदर्शकता आहे हे दाखवण्यासाठी तर हा धरण्याचा प्लॅन नाही आहे ना? काय आप बाहेरचा विचार करुन परत गल्लीत येण्याचा विचार करत आहे? काय आप, कॉंग्रेस आणि गृह मंत्र्यांवर दबाव आणण्यासाठी धऱणे करत आहे?